# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२८ में, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

## वाहतुक अधिसुचना

चंद्रपूर ते गडचांदूर भोयेगांव मार्गे जाणाऱ्या रस्त्यावरील वर्धा नदिच्या पुलाचे काम करणे असल्याने व सदरचे काम संपूर्ण वाहतुक बंद केल्याखेरीज करणे शक्य नसल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग-१, चंद्रपूर यांनी सदर रस्त्याची वाहतुक बंद करुन पर्यायी रस्त्याने वळविण्याबाबत विनंती केली आहे. जनतेला त्रास व असुविधा होवु नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता धानोरा- भोयेगांव मार्गे गडचांदूर रस्ता बंद करुन पर्यायी मार्ग निश्चित करणे आवश्यक आहे.

पोलीस अधीक्षक चंद्रपुर महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ च्या कलम-३३(१)(ब) अन्वये जनतेला धोका, अडथळा किंवा गैरसोय होवु नये तसेच कोणत्याही प्रकारचा अपघात होवु नये व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता राज्य मार्ग क्रमांक ३७३ चंद्रपूर ते गडचांदूर भोयेगांव मार्गे जाणाऱ्या रस्त्यावरील वर्धा नदिच्या पुलाचे काम करणे असल्याने सदरचा रस्ता दि. ३०/०५/२०२० पासुन २० दिवसांकरीता सर्व प्रकारच्या वाहनांना रहदारीस बंद करण्यात येत आहे. वाहतुकदारांनी खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा असे जनतेला निर्देश देत आहे.

- गडचांदूर ते वणी- गडचांदूर वनसडी-कोरपणा-कुरई- आबई फाटा- चारगांव चौकी ते वणी.
- गडचांदूर ते घूग्घूस- गडचांदूर- सांगोडा फाटा- गाडेगांव-विरुर-मुंगोली- नकोडा ते घुग्घूस.
- गडचांदूर- चंद्रपूर- अ) गडचांदूर-खामोना-गौरी- पवनी-कडोली- हडस्ती- आरवट- दाताळा ते चंद्रपूर (हलकी वाहने).
  ब) गडचांदूर-राजुरा-बल्लारशा- चंद्रपूर (सर्व वाहनांकरीता).

सदर अधिसूचना दि. ३०/०५/२० पासुन २० दिवसांपर्यंत अंमलात राहील. वरिल निर्देशांचे पालन करुन प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

---